१६६

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र. :- टीजीओ/ T६० ४/१७
दिनांक :- ३/५/११

## कार्यालयीन आदेश

विषय :- व्हेकन्सी रिफंड प्रकरणांची पुर्तता करणेबाबत.

मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ परिशिष्ट ८ नियम ५६,५७ अन्वये जागा रिकामी राहिल्यामुळे मालमत्ता कराची रक्कम परत देणेबाबत तरतूद आहे. प्रस्तुत तरतुदीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या बिगर निवासी मिळकतदारांनी त्यांची बिगर निवासी मिळकत बंद असल्यास प्रतिवर्षी पुढील सहा महिन्याचा मिळकतकर जमा करून ०१ एप्रिल ते ३० एप्रिल , दुसऱ्या सहामाहिसाठी ०१ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या मुदतीत व्हेकन्सी रिफंडसाठी अर्ज करीत असतात. सदर कालावधीत मिळकत बंद असल्याबाबत व त्याप्रमाणे लेखी दिलेल्या नोटीसीनुसार क्लेम करणेकरिता पहिल्या सहामाहित व दुसऱ्या सहामाहीत मिळकतदार कराच्या परताव्याची मागणी करीता क्लेम अर्ज दाखल करतात.

मिळकतदारांनी प्रत्येक सहामाहीच्या पहिल्या महिन्यात (एप्रिल व ऑक्टोबर) अर्ज दिल्यानंतर सदर मिळकत बंद आहे अगर कसे याबाबत संबंधित पेठ निरीक्षक यांचेकडे सदरचा अर्ज पाठवून त्याप्रमाणे अहवाल प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत अहवाल प्राप्त झाल्यानंतर छापील नमून्यामधील रकान्यामध्ये योग्य ती आकडेवारी गणक विभागाकडील सिनिअर ग्रेड लेखनिक यांनी तयार करून रिफंड प्रोसिजर साठी सदर प्रकरण अंतर्गत अर्थान्वीक्षक यांचेमार्फत पाठविणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे व्हेकन्सी रिफंडच्या प्रकरणाबाबत पुर्तता करणेसाठी श्रीमती पुजा देशमुख व गणक व सिनिअर ग्रेड लेखनिक यांनी कामाची पुर्तता करणे आवश्यक होते. सदर पुर्तता वेळेत होत नसल्याबाबत नागरिकांचे अर्ज मा. महा. आयुक्त व आमचेकडे दाखल होत आहेत.

प्रसिध्द केलेल्या नागरीकांच्या सनदेनुसार नागरिकांनी केलेल्या अर्जाची पुर्तता वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सन २०१०-११ या आर्थिक वर्षात दाखल झालेलो अर्ज संबंधित पेठ निरीक्षक यांचेकडे पाठविण्यात आले असून त्यांचेकडून अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याने पुढील पुर्तता झालेली दिसून येत नाही. याबाबत खालीलप्रमाणे कालबद्ध पध्दतीने कामाची पुर्तता करावी.

१) सन २०१०-११ व त्यापूर्वी आलेल्या अर्जानुसार संबंधित पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचेकडे पाठविण्यात आलेल्या अर्जानुसार जागेवर तपासणी करून विशिष्ट नमुन्यामध्ये माहिती भरून गणक विभागाकडे दि.३१/०५/२०११ पूर्वी पाठविण्याची दक्षता घ्यावी.

२) पेठ निरीक्षक यांच्याकडून आलेल्या अहवालानुसार रिफंडबाबत आकडेमोड गणक व सिनिअर ग्रेड लेखनिक यांनी तयार करून त्यांचे नियंत्रणाखालील सेवकांमार्फत अंतर्गत अर्थान्वीक्षक यांचे मार्फत व्हेकन्सी रिफंड करिता प्रकरण सत्वर सादर करावे.

३) श्रीमती पुजा देशमुख यांचेकडे संगणक विभागाकडील दाखल्याचे कामकाज व परत आलेल्या चेकची कामे असल्याने व्हेकन्सी रिफंडबाबतची पुढील पूर्तता श्रीमती रुपाली कुबडे यांनी करावयाची आहे. व्हेकन्सी रिफंडच्या कार्यवाहीबाबत श्री. हिप्परगी (गणक), श्री. जाधव (सिनिअर ग्रेड लेखनिक) यांनी स्वत: लक्ष देवून कामाची पूर्तता करावी. (यापूर्वी असलेल्या कामासह)

वरीलप्रमाणे विनातजवीज मिळकत कर परतावाच्या अर्जानुसार तत्काळ कार्यवाही पूर्ण करावी.

३/५/११